महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,पुणे विभागीय मंडळ ,पुणे - ४११००५

**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DIVISIONAL BOARD , PUNE -411005**

| DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF) | DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 / 25536712(OFF) | FAX- 020/25536761 E-MAIL - sscboardpune@gmail.com Website- www.sscboardpune.in |
|---|---|---|

प्राधान्य महत्वाचे /तातडीचे

क्र.पुविम/माध्य. गो.इ /शिक्षक पॅनल/ 7679
पुणे - ४११००५
दिनांक - 17/9/25

प्रती,

मुख्याध्यापक ,

----------------------

----------------------

विषय –ई १० वी परीक्षक /नियामक शिक्षकांच्या माहितीचे पॅनल फॉर्म मागविण्याबाबत ...

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येते की,ई.१० वी परीक्षा फेब्रु/मार्च २०२६ व त्यापुढील परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी परीक्षक /नियामक यांची नियुक्ती करण्या संदर्भात पॅनल फॉर्म भरून मागविण्यात येत आहे.

**पॅनल फॉर्म खालील केलेल्या सूचनानुसार भरण्यात यावा.**

१. प्रपत्रामध्ये ई.१० वी ला शिकवत असलेल्या सर्व पात्र विषय शिक्षकांचे संपूर्ण नाव,जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता,शिकवत असलेला विषय,माध्यम,सेवा कालावधी,परीक्षक/नियामक /मुख्य नियामक या कामाचा अनुभव (टर्न),भ्रमणध्वनी क्रमांक, पॅनकार्ड क्रमांक,शाळेचा दूरध्वनी क्रमांक,मुख्याध्यापकाचे नाव व भ्रमणध्वनी क्र.ई –मेल आयडी इत्यादी नमूद करावी.

२. घड्याळी तासिकेवर व अर्धवेळ काम करणाऱ्या शिक्षकांनी उत्तरपत्रिका तपासणी करणे बंधनकारक असल्याने अशा सर्व शिक्षकांची माहिती पॅनल फॉर्म मध्ये देणे आवश्यक आहे.मात्र घड्याळी तासिकेवर काम करणारे शिक्षक अर्हता प्राप्त (Qualified)असणे आवश्यक आहे.सदर शिक्षकांकडून मंडळाच्या उत्तरपत्रिका तपासणे बंधनकारक असल्याचे हमीपत्र घेण्यात यावे व शे-याच्या कॉलममध्ये तसा शेरा नमूद करण्यात यावा.तसेच उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन होऊन व निकाल जाहीर होईपर्यंत सदर शिक्षकांना शाळेमधून कमी करण्यात येऊ नये.तसेच सदर शिक्षक मंडळाच्या गोपनीय कामाकरिता उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संस्थाचालक व मुख्याध्यापक यांची राहील.

मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल विहित मुदतीत जाहीर करणे बंधनकारक असल्याने त्यासाठी उत्तर पत्रिकांचे परीक्षण /नियमनाचे काम मंडळाने नेमून दिलेल्या वेळेत करावयाचे आहे.याची सर्व संबधित शिक्षकांनी दक्षता घेण्याबाबत सूचना आपल्या स्तरावरून शिक्षकांना देण्यात याव्यात.त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा सेवाशर्ती नियम १९८१ व मंडळ मान्यता सेवाशर्ती मधील विहित तरतुदीनुसार मंडळाचे काम (सेवा) अत्यावश्यक सेवा असल्याने आपल्या शाळेतील शिक्षकांना मंडळाच्या तातडीच्या कामाच्या वेळी शाळेच्या इतर कामातून सूट देण्यात यावी.जेणेकरून शिक्षकांकडून उत्तरपत्रिकांचे परीक्षण /नियमन वेळेत व काटेकोरपणे पूर्ण होईल. पॅनल फॉर्म मध्ये नमूद केलेले शिक्षक गुणपडताळणी /पुनर्मुल्यांकन कामासाठी उपलब्ध करून देण्यात यावेत.

३. पॅनल मध्ये मुख्याध्यापकांचे नाव व शिकवत असलेल्या विषयाची माहिती देण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

४. पुणे विभागीय मंडळाची सर्व परिपत्रके आदेश मंडळाच्या www.sscboardpune.in या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.त्यामुळे मंडळाच्या संकेतस्थळाचा नियमितपणे वापर करण्यात यावा.
मंडळाकडून आपल्या शाळेत प्रत्यक्ष भेट देऊन /कॅम्प लाऊन /सभा घेऊन आपण दिलेल्या शिक्षकांच्या माहितीची पडताळणी केली जाणार आहे.म्हणून सत्य स्वरुपात माहिती प्रपत्रामध्ये नमूद करावी.

५. राज्यमंडळाच्या क्र.रा.मं /परीक्षा-३ /२५८६ दिनांक १५/०७/२०२५ रोजीच्या पत्रानुसार सर्व मान्यताप्राप्त शाळांना स्कूल प्रोफाईल दिनांक -१५/०७/२०२५ पासून भरण्यास सुरवात करण्यात आली आहे.
सदरची प्रोफाईल भरण्यास स्कूल प्रोफाईल हि लिंक मंडळाच्या उपलब्ध करण्यात आली आहे.सदर बाब हि आपणास अवगत आहे.जर अद्यापही स्कूल प्रोफाईल भरले नसल्यास त्वरित स्कूल प्रोफाईल भरण्यात यावे.
तेव्हा फेब्रु /मार्च २०२६ ई १० वी परीक्षाकरिता उत्तरपत्रिका तपासण्या साठीचे पॅनल तयार करताना आपल्या मार्फत सादर करण्यात आलेली माहिती व प्रोफाईल मधील शिक्षकांची माहिती तंतोतंत तपासणी करण्यात येणार आहे.तरी सोबतच्या पॅनल फॉर्म मध्ये संपूर्ण माहिती अचूक भरण्यात यावी.

६. पॅनल फॉर्म मध्ये देण्यात आलेली माहिती शाळे मध्ये www.sscboardpune.in या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या अभिलेखाप्रमाणे सोबत जोडलेले हमीपत्र मुख्याध्यापक /संस्थाचालक यांच्या स्वाक्षरीने सादर करावे.हमीपत्र सादर न केलेली माहिती ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. पॅनल संदर्भातील माहिती निर्धारित वेळेत सादर न केल्यास मंडळामार्फत यथोचित कार्यवाही करण्यात येईल.याची नोंद संबंधित शाळेतील मुख्याध्यापकांनी घ्यावी.

सोबत दिलेल्या प्रपत्रामध्ये सर्व विषय शिक्षकांची नावे नोंदवून परिपूर्ण पॅनल फॉर्म दिनांक २२/०९/२०२५ पर्यंत मुख्याध्यापकांच्या सही शिक्यानिशी कार्यालयात हस्तपोच जमा करण्यात यावे. पॅनल फॉर्म सोबत सन २०२५-२०२६ च्या संच मान्यतेची सत्यप्रत जोडण्यात यावी. पॅनल फॉर्म संदर्भात आपणाकडे स्मरणपत्र किंवा पाठपुरावा करावा लागणार नाही याची दक्षता घ्यावी. पॅनल फॉर्म पोस्टाद्वारे अथवा कुरियर द्वारे मंडळ कार्यालयात पाठविण्यात येऊ नये.

सदरची माहिती शिपायांमार्फत न पाठविता आपल्या शाळेतील लिपिकांमार्फत जमा करण्यात यावी,जेणेकरून त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्यांचे निराकरण करणे सुलभ होईल.

Digitally signed by
Kailas Ganpatrao Datkhil
Date: 11-09-2025
12:42:06

विभागीय सचिव
(कैलास दातखीळ)
पुणे विभागीय मंडळ, पुणे-५

सोबत- पॅनल फॉर्म, हमीपत्र नमुना

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यावाहीस्तव:
१.मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे.
२.माध्यमिक शिक्षणाधिकारी पुणे,अहिल्यानगर,सोलापूर

Scanned with OKEN Scanner

INDEX NO.__________

# संयुक्त हमीपत्र

प्रति,

मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ पुणे-५

**विषय:** माध्यमिक शालांत (इ.10 वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु.-मार्च २०२६ परीक्षेच्या उत्तरपत्रिका मुल्यमापन करून घेणे व इतर कामकाजासंबंधी हमीपत्र सादर करण्याबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरून आम्ही हमीपत्र सादर करतो की –

१) आमच्या शाळेतील ज्या ज्या विषयास विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत त्या विषयास ज्या शिक्षकांची (पूर्णवेळ, अर्धवेळ, घड्याळी तासिका, तात्पुरत्या स्वरूपात) नियुक्ती केली आहे त्यांच्याकडून लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील.

२) तसेच ज्या शिक्षकांची नियुक्ती घड्याळी तासिका तत्त्वावर व तात्पुरत्या स्वरूपात केली आहे त्या विषय शिक्षकाकडून शैक्षणिक अभ्यासक्रम संपुष्टात आला असला तरीही मंडळाच्या उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज पूर्ण करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील.

३) परीक्षा कालावधीत व उत्तरपत्रिका तपासणीच्या कालावधीत कोणत्याही विषय शिक्षकाची रजा मंजुरीस शिफारस केली जाणार नाही.

४) मंडळ कार्यालयाकडून शिक्षक पॅनल मागविण्यात आले आहे. त्यामध्ये आमच्या शाळेतील ज्या विषयास विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत त्या सर्व विषयांस शिकविले जाणाऱ्या सर्व शिक्षकांची माहिती ज्या त्या विषया समोर परिपूर्ण देण्यात आली आहे. कोणत्याही शिक्षकाची माहिती देणे शिल्लक राहिलेले नाही.

५) मंडळ कार्यालयाकडून आमच्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावे लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचा सिलबंद गठ्ठा पोस्टाद्वारे प्राप्त होताच प्रशासकीय प्रमुख या नात्याने स्वतःच्या ताब्यात तात्काळ घेण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत पोस्टाद्वारे प्राप्त होणाऱ्या

Scanned with OKEN Scanner

उत्तरपत्रिकांचे गठ्ठे नाकारले जाणार नाहीत व विभागीय मंडळ कार्यालयाकडे परत पाठविले जाणार नाहीत.

६) एखाद्या विषय शिक्षकावर दुसरे अथवा मंडळाकडून अन्य उत्तरपत्रिकेचा भार दिला आहे किंवा अन्य विषयाच्या उत्तरपत्रिका दुसऱ्या गटातून प्राप्त झाल्या असतील. तर असे गट तात्काळ स्वीकारण्यात येतील व याबाबत प्रथम प्राचार्यांनी पडताळणी करावी. अन्यथा कारवाईबाबत ई-मेल **sscboardpune@gmail.com** या पत्त्यावर प्रथम दिवशी मंडळास विनंतीद्वारे कळविण्यात येईल.

- किरकोळ दोन किंवा त्यापेक्षा जास्त विषय शिकविणाऱ्या विषय शिक्षकास एका विषयाच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी आल्या असता अन्य विषयांच्या उत्तरपत्रिकांचा दुसरा गट आल्यास त्या तात्काळ स्वीकारण्यात येतील व संबंधित विषय शिक्षकांकडून तपासून घेण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

७) तसेच आमच्या शाळेतील एखाद्या विषय शिक्षकास परीक्षेच्या कामकाजाबाबत तात्काळ बोलाविल्यास त्यांना मंडळात हजर राहण्यासाठी तत्काळ कार्यमुक्त करण्यात येईल.

८) वरील प्रमाणे (कलम १ ते ७) नमूद केल्यानुसार मंडळाच्या आयोजित परीक्षेच्या कामकाजास प्रथम प्राधान्य देण्यात येईल व त्याप्रमाणे कामकाज पूर्ण करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. तसेच परीक्षा कामकाजात आमच्याकडून हलगर्जीपणा अथवा अडथळा निर्माण केला गेला असल्यास आमच्यावर मंडळाकडून एकतर्फी **खाजगी शाळा सेवाशर्ती अधिनियम १९८१** मधील अटीशर्तीनुसार कारवाई केली जाऊ शकते, हे आम्हाला ज्ञात आहे.

**सबब हे संयुक्त हमीपत्र सादर करण्यात येत आहे.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळा सांकेतांक क्र. | S | | | | | | | | |
| शाळेचे नाव | | | | | | | | | |
| संस्थेचे नाव | | | | | | | | | |
| मुख्याध्यापक नाव व मोबाईल क्र. | | | | | | | | | |
| संस्था सचिवांचे नाव मोबाईल क्र. | | | | | | | | | |

मुख्याध्यापक
सही व शिक्का

संस्था सचिव
सही व शिक्का

टीप – संयुक्त हमीपत्र मंडळामार्फत प्राप्त शिक्षक यादी (पॅनेल) सोबत जोडून द्यावे.

Scanned with OKEN Scanner

# MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION,

## PUNE DIVISIONAL BOARD, PUNE 411 005.

**Form of Information about the Teachers teaching various subjects in school with subjectwise preferences for Appointment to Board Work during March 2024 to 2026**

School Index No. S | | | | | | | 

Name of the School ______________________

Total No. of Divisions of Std. X Class (Put one digit in one box) ☐☐

No. of Aided Division's of Std X ☐☐

No. of Unaided Division's of Std X ☐☐
(Put one digit in one box)

Total No. of Teachers of Std X ☐☐

No of Aided Teachers of Std X ☐☐

No of Unaided Teachers of Std X ☐☐
(Put one digit in one box)

Clerk Name ______________

Clerk Mob.No ______________

सूचना : (१) माध्यमिक शाळांतील इ. १० वी ला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांची माहिती द्यावी. (२) यापूर्वी मंडळाच्या कामामधून (परीक्षेच्या कामापासून) कायमस्वरूपी प्रतिबंध केलेल्या शिक्षकांची माहिती तांबड्या शाईत लिहिण्यात यावी व शेरे कॉलममध्ये मंडळ पत्राचा क्रमांक नमूद करावा. (३) निलंबित / प्रदीर्घ रजेवर असणाऱ्या शिक्षकाचे माहितीत शेरे कॉलममध्ये तांबड्या शाईत निलंबन / रजेचा कालावधी नमूद करावा. (४) मंडळ कामाच्या अनुभवाचा पुरावा सोबत जोडावा. (५) शिक्षकांना परीक्षेतील गैरप्रकाराबाबत मंडळामार्फत कायमस्वरूपी प्रतिबंधाखेरीज इतर कोणतीही शास्ती झालेली असल्यास तसे हिरव्या शाईने शास्तीच्या संक्षिप्त तपशीलासह शेरे कॉलममध्ये नमूद करावे.

| S. N. | Name of the Teacher<br>Surname Name Middle Name<br>(In BLOCK CAPITAL Letters) | Mobile No. | Subject taught<br>1 ______<br>2 ______ | Preference of subjects<br>1 ______<br>2 ______ | Subject Code | Med. of Inst. | Date of Birth | Educational Qualification Academic-1 Professional-2 | Teaching Experience (in years) | Subjectwise Boards Exp. | | | | Last Exam Appt. No. | | Sign. of Teacher | ~~Remarks~~ PAN No. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | Examr. turn | Mod. turn | CM turn | Pap. Set. turn | March | July | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 11 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 12 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 13 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 14 | | | | | | | | | | | | | | | | | |
| 15 | | | | | | | | | | | | | | | | | |

I, the undersigned, certify that the information given above is correct as per the record of the School and that names of all eligible teachers are incorporated. I will be held responsible for any incorrectness or fault in the information furnished above.

Date :

Place :

Signature of the Head Master / Head Mistress / Principal
and Stamp of the School.

Name ______________________

Telephone No. ____________ Mobile No. ____________

Scanned with OKEN Scanner